**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.- ०१**

| | | |
|---|---|---|
| साक्षीदाराचे नाव | - | विमल अरूण कुहीटे |
| वय | - | ४२ वर्ष |
| धंदा | - | पोलिस हवालदार बक्कल नं.१५२१ |
| राहणार | - | पोलिस स्टेशन बेला, जि.नागपुर. |

## सरतपासणी सरकारतर्फे ॲड. श्री. बारस्कर

१. दि.२६.०५.२०१४ रोजी मी पोलिस स्टेशन बेला येथे कार्यरत होती. त्यादिवशी माझी स्टेशन डायरीवर सकाळी ०८.०० ते दुपारी ०२.०० पर्यंत डयुटी होती. त्यादिवशी आमच्या पोलिसस्टेशनला मी हजर असतांना मध्यवर्ती कारागृह नागपुर येथील पोलिस हवालदार भागवत कोहळे हे एक आरोपी संजय मुन हा रजेवर होता, तो कारागृहात मुदतीच्या आत आला नाही म्हणुन त्याच्याविरूध्द लेखी तक्रार अधिक्षक मध्यवर्ती कारागृह नागपुर यांच्यावतीने घेवुन आले होते. त्या तक्रारीची प्रत आता मला दाखविण्यात आली ती तीच असुन त्यावर माझी सही आहे, ती निशाणी ०६ वर आहे. त्यानंतर मी आरोपीविरूध्द अपराध क्रं. ३०१४/२०१६ नुसार कलम २२४ नुसार गुन्हयाची नोंद केली. आता मला एफ.आय.आर.ची नक्कल दाखविण्यात आली त्यावर माझी व फिर्यादीची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे, तो एफ.आय.आर. निशाणी ०७ वर आहे. त्यानंतर सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गिरडकर यांनी केला.

## उलट-तपासणी आरोपीकरीता ॲड. तोवर

२. आरोपीच्या निशाणी ०८ वरील अर्जानुसार उलटतपास पुढील

तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.

वा. दा. ब. अ. क. केले

माझे समक्ष

(डि.बी.गुट्टे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी उमरेड
दि.२०.१२.२०१६

(डि.बी.गुट्टे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी उमरेड
दि.२०.१२.२०१६